६६

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दुरध्वनी २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७
E Mail-1)desk15dte@gmail.com 2) System@dte.org.in 3) Desk15@dte.org.in

परिपत्रक

क्रमांक:१५/तंशिसं/अर्थस/ईबीसी-ऑनलाईन-फार्म भरणे/२०१६-१७/८२
दिनांक : 29 AUG 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय:-शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेच्या अंमलबजावणीबावत.........
खाजगी विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतनासमवेत शासकीय व अनुदानीत महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठातील विनाअनुदानीत तत्वावर चालविल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५०% प्रतिपूर्ती बाबत. (संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज भरुन घेणे)
संदर्भ :- शासन निर्णय क्र. टीईएम/प्र.क्र.२१९/तांशि-४, दि. ३१ मार्च, २०१६.

उपरोक्त विषयास अनुसरुन खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतना समवेत शासकीय व अनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने/शासकीय विद्यापीठ मधील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत असणा-या ज्या अभ्यासक्रमाचे शुल्क " शासकीय अथवा शासन अनुदानित संस्था किंवा शासकीय विद्यापीठ वगळून अन्य सर्व खाजगी विनाअनुदानित संस्थांमधील अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क हे "शिक्षण शुल्क समितीव्दारे" ठरविण्यांत येते सदर संस्थांचे "शिक्षण शुल्क शिक्षण नियामक प्राधिकरणा" कडून निश्चित करणे आवश्यक राहील. अशा संस्थामधील केन्द्रिय प्रवेश प्रक्रियेद्वारे शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५०% रक्कमेची प्रतिपूर्ती योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी (ऑनलाईन) संगणकीय प्रणालीवर संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेत स्थळावर E.B.C. Concession येथे संस्थातील विद्यार्थ्यांने माहिती भरावयाची आहे.

विद्यार्थ्यांचे अर्ज व आवश्यक ती कागदपत्रे महाविद्यालये/तंत्रनिकेतने/विद्यापीठांनी उपलब्ध करुन घ्यावयाची आहे. त्यासाठी सर्व सूचना/परिपत्रक संबंधीत संस्थांनी/विद्यापीठांनी सूचना फलकावर दर्शनी भागात ठळक व व्यापक स्वरुपात प्रसीध्द करावेत. तसेच सदरहू सूचना विद्यार्थ्यांच्या वर्गामध्ये शिक्षकांमार्फत दयावी. संस्था/ महाविद्यालय/ विद्यापीठ मधील कोणताही विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता संस्थेच्या /महाविद्यालयाच्या/ विद्यापीठाच्या प्रमुखांनी घ्यावी. जर विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहील्यास याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या/महाविद्यालयाच्या/ विद्यापीठाच्या प्रमुखांची राहील. अशा सूचना आपल्या स्तरावरुन खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतनासमवेत शासकीय व

सहसंचालक तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक 6172
दिनांक 30 AUG 2016

अनुदानित महाविद्यालये/ तंत्रनिकेतने/शासकीय विद्यापीठ यांना देण्यांत याव्यात. संगणक प्रणालीवर विषयांकित संस्था, महाविद्यालये व विद्यापीठ मधील विद्यार्थ्यांनी संगणक प्रणालीमध्ये ऑनलाइन अर्जाची माहिती दिनांक २९ ऑगस्ट २०१६ ते १५ सप्टेंबर २०१६ पर्यंत भरण्यात यावी. तसेच संस्थांनी अर्जाची संपुर्ण छाननी करून माहीती / आकडेवारी सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांना दि. २० सप्टेंबर २०१६ पर्यंत सादर करावी. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांनी प्राप्त अर्जाची छाननी विभागीय कार्यालय स्तरावर समिती गठीत करून अहवाल या कार्यालयास दि. १० ऑक्टोबर २०१६ पर्यंत सादर करण्यात यावा. याबाबतच्या सूचना सर्व संबंधीत संस्थांना आपल्या स्तरावरुन देण्यांत याव्यात.

उपरोक्त योजनेसाठी विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीच्या वापराच्या अनुषंगाने विभागीय कार्यालये/अधिनस्त संस्थांना/विद्यापीठे यांना अडीअडचणी उद्भवल्यास desk3@dtemaharashtra.gov.in या E-mail (इमेल) व दूरध्वनी क्रमांक ०२२ ३०२३३४६८/ ४३५ यावर संपर्क साधावा.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :- प्रणाली विश्लेषण तथा समन्वयक, कार्यासन क्रमांक -३, मुख्य कार्यालय, मुंबई यांच्या माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता.

क्र.तंशिसं/विकाना/ईबीसी-ऑनलाईन-फार्म/2016/ 2496
दिनांक : 31 AUG 2016

प्रति,
संचालक/प्राचार्य,
सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित तसेच
शासकीय व अनुदानित पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविका संस्था
नागपूर विभाग, नागपूर

उपरोक्त पत्रात नमूद केल्यानुसार योग्य ती कार्यवाही करुन माहिती या कार्यालयास दिलेल्या मुदतीत त्वरीत सादर करण्यांत यावी जेणेकरुन सदरहू माहिती संचालनालयास सादर करणे सोईचे होईल.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर